महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती 7588005002 या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) वर्ष : दुसरे अंक : ११ वा दिनांक : २५/०९/२०२४ वार : बुधवार

# मोदींना पंतप्रधान पदाचा राजीनामा द्यावा लागेल

## संजय राऊत कडाडले, महाराष्ट्रात महाविकास आघाडीचं राज्य येईल



**मनमाड :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे नेते खारदार संजय राऊत मंगळवारी मनमाड येथे एका कार्यक्रमाला संबोधित करत होते. यावेळी बोलताना संजय राऊत यांनी नेहमी प्रमाणेच तडाखेबंद भाषण केलं. चौफेर फटकेबाजी करत त्यांनी राज्यातील मिंधे सरकार आणि केंद्रातील एनडीए सरकारवर हल्लाबोल केला. 'महाराष्ट्राची निवडणूक होऊ द्या, ज्या दिवशी महाराष्ट्रात महाविकास आघाडीचं राज्य येईल, त्या दिवशी नरेंद्र मोदींना पंतप्रधान पदाचा राजीनामा द्यावा लागेल, त्यांचं सरकार कोसळलेलं असेल', असा विश्वास संजय राऊत यांनी व्यक्त केला आहे.आपल्या भाषणावेळी संजय राऊत यांनी राज्यात गेल्या दोन महिन्यात घडलेल्या घटनांवरून मिंधे सरकारच्या कारभाराचा बुरखा फाडला. मालवणातील राजकोट किल्ल्यावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा पडल्याच्या घटनेला हात घालत ते म्हणाले की, 'विविध पुतळ्यांमागे किती भ्रष्टाचार झाला याचा हिशोब आपल्याला करावा लागेल आणि आपलं सरकार येईल तेव्हा या सगळ्याची चौकशी लावावी लागेल'.'गेल्या १० वर्षात नरेंद्र मोदींच्या राज्यात यांनी जे जे करण्याचा प्रयत्न केला त्या सगळ्याला गळती लागली आहे. ब्रिटीश काळात बनलेली ऐतिसाहिक इमारत आजही मजबूत, भक्कम आहे. अजून १०० वर्ष टिकेल. पण नरेंद्र मोदींनी नवीन संसद भवन बांधलं २० हजार कोटी रुपये वापरून... पहिल्या पावसात पाणी धो धो पडलं आणि अक्षरश: प्लॅस्टिकच्या बादल्यांनी पाणी आम्हाला बाहेर काढावं लागलं. हे नरेंद्र मोदींचं काम आहे. २० हजार कोटी पैकी किमान १० हजार कोटी भाजपच्या तिजोरीत गेले', असा घणाघाती आरोप संजय राऊत यांनी केला.'नरेंद्र मोदींनी निवडणुकीसाठी हजारों कोटी खर्चून अयोध्येत राम मंदिर बांधलं. पण पहिल्या पावसात ते देखील गळायला लागलं. रामाच्या मंदिरात सुद्धा पैसे खाल्ले. मुंबईत बांधलेल्या अटल सेतूलाही तडे गेले आहेत', अशी आठवण त्यांनी करून दिली.त्यांना मुंबई ही महाराष्ट्रापासून तोडायची आहे![embedded content]'सर्वत्र भष्टाचार करायचा सर्वत्र पैसे खायचे सगळं काही पैशानं विकत मिळू शकतं आणि विकत घेऊ शकतो, मग आमदार असतील, खासदार असतील या व्यापारी वृत्तीने हे सरकार चाललं आहे. मग महाराष्ट्र असेल किंवा हिंदुस्थान असेल. एक गुजराती व्यापारी मंडळ या देशावरती राज्य करत आहे आणि मराठी माणसाला कंगाल आणि भिकारी करतं आहे. हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांनी शिवसेनेची स्थापना केली ती मराठी माणसासाठी, त्याला न्याय देण्यासाठी, त्याच्यातला स्वाभिमान जिवंत ठेवण्यासाठी. मोदी आणि शहांनी ही शिवसेना तोडली. शिवसेनेचे आमदार फोडले, विकत घेतले, कारण त्यांना शिवसेना तोडून महाराष्ट्राची राजधानी असलेली मराठी माणसाची मुंबई ही महाराष्ट्रापासून तोडायची आहे', असं संजय राऊत म्हणाले.'या मुंबईतील, महाराष्ट्रातील सगळे उद्योग नरेंद्र मोदी, अमित शहांनी गुजरातला नेले. मात्र मुख्यमंत्री एकनाथ शिंदे त्यावर बोलायला तयार नाही. देवेंद्र फडणवीस महाराष्ट्रावरील अन्यायावर बोलायला तयार नाही. हे आपण सगळ्यांनी लक्षात ठेवावं', असंही ते म्हणाले.'तुमच्या हातात सत्ता आहे. तुमच्या हातात पैसा, पोलीस, ईडी आहे. त्याचा वापर करून महाराष्ट्र कमजोर करयाचा. म्हणजे या राज्यातला शेतकरी, कष्टकरी, स्वाभिमानी तरुण कमजोर होणार. पक्ष फोडून, पैसे देऊन तुम्ही सरकार चालवायचे. पण तरीही सर्व काही गमावून पक्ष, चिन्ह गमावून उद्धव ठाकरे खंबीरपणे उभे आहेत आणि टक्कर देताहेत आणि या महाराष्ट्रात मोदींचा पराभव करण्याचा काम आपण सगळ्यांनी केलं आहे. मोदींचा ४०० पारचा नारा होता ना त्या ४०० पारला बूच लावण्याचं काम महाराष्ट्रानं केलं आहे. ३१ खासदार आहेत आमचे. पक्ष, चिन्ह काही नाही आमच्याकडे आणि उद्याच्या विधानसभेत आम्हाला ही सत्ता परत ताब्यात घ्यायची आहे. घ्यावीच लागेल. मराठी माणूस आणि महाराष्ट्राचे अस्तित्व आपल्याला टिकवायचे असेल तर आपल्याला सत्ता हातात घेऊन उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्त्वात हे राज्य निर्माण करावं लागेल', अशा शब्दात त्यांनी ठणकावलं.हे चोरांचं राज्य आहे. सर्वोच्च न्यायालय त्यांचं, न्यायालय त्यांचं, निवडणूक आयोग त्यांचा, पोलीस त्यांचे. आम्हाला तुरुंगात टाकलं का तर आम्ही मोदींच्या विरुद्ध उभे आहोत. खोट्या केसेस मध्ये आबाला तुरुंगात टाकलं. टाका तुरुंगात. बाहेर येईन, तुरुंगाच्या भिंती आम्हाला जास्त काळ थांबवू शकणार नाही. तुम्हाला २४० वर आणलं ना, आता कुबड्यांवर तुमचं राज्य आहे. चंद्राबाबू आणि नितीश कुमार या कमजोर कुबड्या आहेत. कधीही जातील. आम्हाला तुरुंगात टाकता? सत्ता वर्षभरात जाणार आहे. महाराष्ट्राची निवडणूक होऊ द्या, ज्या दिवशी महाराष्ट्रात महाविकास आघाडीचं राज्य येईल त्या दिवशी नरेंद्र मोदींना पंतप्रधान पदाचा राजीनामा द्यावा लागेल, त्यांचं सरकार कोसळलेलं असेल, असा विश्वास संजय राऊत यांनी व्यक्त केला आहे.

# बीड जिल्ह्यातील प्राचार्यांची गुरूवारी बैठक



**छत्रपती संभाजीनगर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाशी संलग्लीन सर्व महाविद्यालयांतील (शहरी व ग्रामीण) प्राचार्यांची परीक्षेसंदर्भातील बैठक गुरूवार २६ सप्टेंबर २०२४ रोजी आर. बी. अट्टल महाविद्यालय गेवराई येथे आयोजित करण्यात आली आहे.

परिक्षा व मुल्यमापन मंडळाच्या संचालकांनी काढलेल्या पत्रकात म्हटले आहे की, ऑक्टो/ नोव्हें. २०२४ सत्राच्या सर्व पदवी अभ्यासक्रमाच्या परिक्षांचे आयोजन करण्याच्या अनुषंगाने व विद्यार्थ्यांच्या ए.बी.सी. आय.डी. सादर करण्याच्या संदभा्रत ही बैठक आयोजित केली आहे. अशाच बैठका प्रत्येक जिल्ह्यात घेण्यात येणार आहेत.

आर. बी. अट्टल महाविद्यालय गेवराई येथे २६ सप्टेंबर २०२४ गुरूवार रोजी दुपारी १२.३० वाजता होणाऱ्या या बैठकीसाठी बीड जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयांचे प्राचार्य आणि परिसस्थांचे संचालक यांनी उपस्थित राहणे बंधनकारक असल्याचेही या पत्रकात नमुद करण्यात आले आहे.

# भाजप तीन नेत्यांच्या नेतृत्वात लढणार विधानसभा

## नागपूर येथील भाजपच्या आढावा बैठकीत निवडणुकीची रणनीती



**नागपूर :** येथे केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या उपस्थितीत झालेल्या कार्यकर्त्यांच्या संवाद बैठकीत कार्यकर्त्यांना पत्रके वाटण्यात आली. या पत्रकांमध्ये अमित शाह, नितीन गडकरी, देवेंद्र फडणवीस आणि चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनात आगामी विधानसभा निवडणूक लढवायची असल्याचा उल्लेख करण्यात आला आहे. त्यामुळे आगामी निवडणुकीची धुरा ही राज्यातील या तीन नेत्यांवर आहे, हे स्पष्ट झाले आहे.

या पत्रकात महाराष्ट्र विधानसभा निवडणूक जिंकत नाही तोपर्यंत कोणीही थकणार नाही, विश्रांती घेणार नाही. आता सर्वांचे एकच लक्ष्य आहे महाराष्ट्र विधानसभा निवडणूक, असे म्हणले आहे. काही लोक चक्रव्युहात अडकवण्याचा प्रयत्न करत आहेत. मात्र आपल्याला हा चक्रव्यूह भेदायचा आहे असा कानमंत्र ही कार्यकर्त्यांना या पत्रकाच्या माध्यमातून देण्यात आला आहे. त्याच सोबत कार्यकर्त्यांना काही सूचना तसेच निवडणुकी संदर्भात नियोजन पद्धती मांडण्यात आली आहे.

आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप कोअर कमिटी बैठकीत युवा मोर्चा व महिला मोर्चांवर विशेष जबाबदारी असणार आहे. तरुण व महिलांची मतदार नोंदणी मोठ्या संख्येने करण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. याचसोबत लाडकी बहीण आणि लाडका भाऊ लाभार्थी वाढवण्याच्या देखील सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे आगामी निवडणुकीसाठी भाजपने तरुण व महिलांकडे विशेष लक्ष देण्याची रणनीती आखली असल्याचे स्पष्ट होत आहे.

दरम्यान, नागपुरात झालेल्या आढावा बैठकीत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह आलेले असताना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी मात्र उपस्थित नसणार आहेत. नितीन गडकरी हे जम्मू काश्मीरच्या दौऱ्यावर आहेत. जम्मू काश्मीर येथील निवडणूक प्रचाराचा त्यांचा हा नियोजित दौरा आहे. त्यामुळे नागपूर येथील आढावा बैठकीला स्थानिक भाजप खासदार भाजपचे प्रमुख नेते उपस्थित असले तरी नितीन गडकरी उपस्थित नसणार आहेत. त्यामुळे नितीन गडकरी यांना डावलले तर जात नाहीये? अशी चर्चा राजकीय वर्तुळात होत आहे.

# बदलापूर प्रकरणात नवा ट्विस्ट?

## शाळेचे ट्रस्टी मानवी तस्करी आणि चाईल्ड पॉर्नोग्राफीत सहभागी असल्याचा गंभीर आरोप

**बदलापूर :** बदलापूरमधील एका शाळेत दोन लहान मुलींवर लैंगिक अत्याचार करणारा आरोपी अक्षय शिंदे याचं एन्काऊंटर झालं आहे. अक्षय शिंदे याच्या एन्काऊंटरच्या घटनेने फक्त राज्यातच नव्हे तर देशभरात खळबळ उडाली आहे. या घटनेवरून विरोधी पक्षांनी महायुती सरकारची कोंडी केली आहे. आता या प्रकरणात नवा ट्विस्ट आला आहे. या ट्विस्टने मोठी खळबळ उडवून दिली आहे. शाळेचे ट्रस्टी मानवी तस्करी आणि चाईल्ड पॉर्नोग्राफीत सहभागी असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे. बड्या आरोपींना वाचवण्याचा प्रयत्न सुरू असल्यानं संपूर्ण तपास तातडीनं सीबीआयकडे वर्ग करण्याची मागणी करत आरटीआय कार्यकर्ता केतन तिरोडकर यांनी हायकोर्टात जनहीत याचिका केली आहे. अक्षय शिंदेनं पोलिसांकडे माजी आयपीएस अधिकारी मीरा बोरवणकर यांना भेटण्याची इच्छा व्यक्त केल्याचा दावाही याचिकेतून करण्यात आला आहे.हायकोर्टाने स्थापन केलेल्या विशेष समितीपुढे आरोपी गेला तर प्रकरण वेगळ्याच वळणार जाईल, या भीतीनं त्याचा एन्काऊंटर झाल्याचा गंभीर आरोप याचिकेतून याचिकेतून करण्यात आला आहे. बदलापूर घटनेचा गुन्हा नोंद झाल्याच्या दुसऱ्याच दिवशी त्या शाळेतून आणखी एक मुलगी बेपत्ता झाल्याची तक्रार त्याच पोलीस ठाण्यात दाखल झाल्याची माहिती आहे. ट्रस्टी आणि शाळेतून सीसीटीव्ही गायब करणारा कर्मचारीही अद्याप फरार असल्याने ठाणे पोलीस आणि एसआयटीच्या कारभारावर सवाल प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanashaktinews.com छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), बुधवार २५ सप्टेंबर २०२४


# बालरंगभूमीच्यावतीने जल्लोष लोककलेचा स्पर्धात्मक महोत्सव

## बालकलावंतांच्या सादरीकरणास ७५ हजारांची पारितोषिके : अभिनेत्री निलम शिर्के सामंत यांची उपस्थिती




**संभाजीनगर** : बालरंगभूमी परिषद मुंबईतर्फे लोककलांची माहिती व महती लहान मुलांमुलींपर्यंत पोहचण्यासाठी राज्यभरात 'जल्लोष लोककलेचा' हा महोत्सव राबविण्यात येत आहे. छत्रपती संभाजीनगर शहरात या महोत्सवाचे आयोजन दि. ७ ऑक्टोबर २०२४ रोजी करण्यात येत आहे. हा महोत्सव सादरीकरणासोबतच स्पर्धात्मक महोत्सव असून, या महोत्सवाचे उद्घाटन अभिनेत्री निलम शिर्के सामंत यांच्या हस्ते होणार आहे.

या महोत्सवात सादरीकरण करणाऱ्या बालकलावंताकरिता तब्बल ७५ हजार रुपयांची पारितोषिके दिली जाणार आहेत. बालरंगभूमी परिषदेच्या छत्रपती संभाजी नगर जिल्हा शाखेतर्फे दि. ७ ऑक्टोबर रोजी एकल स्पर्धा समूह स्पर्धा तापडिया नाट्यमंदिर निराला बाजार, छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी सकाळी ९:०० वाजता होणार आहेत. या महोत्सवात वय ६ ते १५ या वयोगटातील ( इयत्ता पहिली ते दहावी) बालकलावंतांसाठी लोककला या प्रकारातील समूह नृत्य, समूह गायन, एकल गायन, एकल नृत्य व एकल वादन अशा स्पर्धा होणार आहेत.

स्पर्धेसाठी कोणतीही प्रवेश फी नसून, स्पर्धेतील विजेत्यांना स्मृतिचिन्ह व रोख पारितोषिके देण्यात येणार आहे. तसेच सहभागी सर्व बालकलावंतांना सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.समूह नृत्य आणि समूह गीत स्पर्धेकरिता सर्वोत्कृष्ट रु.११ हजार रोख व स्मृतिचिन्ह, उत्कृष्ट रु.७ हजार रोख व स्मृतिचिन्ह, उत्तम रु.५ हजार रोख व स्मृतिचिन्ह तसेच प्रशंसनीय ठरणाऱ्या दोन समूह नृत्य व समूह गीतांना प्रत्येकी दोन हजार रुपये रोख व स्मृतिचिन्ह असे पुरस्कार देण्यात येणार आहेत.

एकल नृत्य , एकल वाद्य वादन, एकल गायन स्पर्धेत सहभागी होणाऱ्या बालकलावंतांना सर्वोत्कृष्ट ३,००० रुपये रोख व स्मृतिचिन्ह, उत्कृष्ट २ हजार रुपये रोख व स्मृतिचिन्ह, उत्तम १ हजार रुपये रोख व स्मृतिचिन्ह तर प्रशंसनीय ठरणाऱ्या दोन कलावंतांना पाचशे रुपये रोख व स्मृतिचिन्ह पारितोषिक स्वरुपात देण्यात येणार आहे.

बालरंगभूमी परिषदेने आयोजित केलेल्या 'जल्लोष लोककलेचा' या महोत्सवात जास्तीत जास्त शाळा, विद्यालयांनी तसेच बालकलावंतांनी सहभागी व्हावे असे आवाहन बालरंगभूमी परिषद छत्रपती संभाजीनगर जिल्हा शाखेचे भाग्यश्री कुलकर्णी, डॉ. इकबाल मिन्ने, सतीश म्हस्के, अभिजीत भातलौंडे, गोकुळ गायकवाड, वाल्मीक जाधव, सुशील बनकर, अर्चना देवधर , श्रीपाद पदे आदींनी केले आहे. जल्लोष लोककलेचा महोत्सवात सहभागी होणाऱ्या इच्छुक संस्थांनी, शाळांनी विद्यार्थ्यांनी २ऑक्टोबर पर्यंत व्हाट्सअप द्वारे प्रवेश अर्ज आणि व्हिडिओ समूह लोकनृत्य करिता संतोष कुलकर्णी ९९२३२४४३३०, समूह लोकगीत गायन करिता असलम शेख ८२३७३७८६८६, एकल वादन करिता लक्ष्मण अहिरे ९८२३१८१३१८, वैयक्तिक लोकनृत्य करिता रूपाली आल्हाट ८८४७७८९७७१, वैयक्तिक लोकगीत गायन करिता प्रा. विशाखा शिरवाडकर ९६६५४९५९८९ क्रमांकावर संपर्क साधून पाठवावा.

# आरटीओ कर्मचारी बेमुदत संपावर

## विविध मागण्यांसाठी आरटीओ दालनासमोर निदर्शने



**छत्रपती संभाजीनगर** : राज्य मोटार वाहन विभागातील कर्मचाऱ्यांनी विविध मागण्यांसाठी संप पुकारला आहे. छत्रपती संभाजीनगर प्रादेशिक परिवहन विभागातील सर्व 100% कर्मचाऱ्यांनी बेमुदत संपात सहभाग घेतला. त्यामुळे संपाच्या पहिल्याच दिवशी वाहनांचे हस्तातंरण, कर्ज प्रकरणे, नोंदी, शुल्क वसुली आदी कामे पूर्णपणे ठप्प होती.. कार्यालयीन कामाजाचा खोळंबा झाला होता. यामुळे वाहन चालक मालकांची प्रचंड गैरसोय झाली. तसेच ७० टक्के महसुल देखील बुडाला आहे. आकृतीबंधाची अंमलबजावणी करा. आकृतीबंधानुसार तात्काळ पदोन्नती द्यावी. सेवा प्रवेशाची त्वरीत अंमलबजावणी करावी, जाचक अटी रद्द कराव्यात. समायोजन रद्द करावे. महसूली बदल्या रद्द कराव्यात. कळसकर समितीची सुधारीत अंमलबजावणी व्हावी. या प्रमुख मागण्यांसाठी राज्य मोटार वाहन विभागातील १६०० कर्मचाऱ्यांनी बेमुदत संप पुकारला आहे. सरकारकडे वारंवार मागणी करूनही मागण्यांची पूर्तता होत नाही. याचा निषेध नोंदवण्यासाठी आरटीओतील संपात सहभागी झालेल्या कर्मचाऱ्यांनी आरटीओच्या दालनासमोरच निदर्शने आंदोलन देखील केले. आमच्या मागण्या मान्य करा, जाचक अटी रद्द करा, महसूल बदल्यांचा निर्णय मागे घ्यावा, अशा घोषणा संपातील कर्मचाऱ्यांनी देऊन सर्वांचे लक्ष वेधले. जोपर्यंत मागण्या मान्य होत नाही तोपर्यंत संप सुरूच राहणार असल्याची माहिती कर्मचाऱ्यांनी दिली. कार्यकारी अधिकारी संघटना (राजपत्रित अधिकारी) मोटर वाहन विभाग महाराष्ट्र राज्य संघटना व राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेच्या वतीने राज्यातील मोटार परिवहन कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी विविध मागण्यांसाठी जो संप पुकारला आहे तो न्याय तत्वावर असून त्याला पाठिंबा दिला आहे. तसे पत्र त्यांनी संपकारी कर्मचारी संघटनेला व शासन आणि परिवहन प्रशासनालाही दिले आहे.

# शरद पवारांचा जरांगेंना पूर्ण पाठिंबा

## निवडणुकीनंतर ओबीसीतून आरक्षण देण्याचा प्रयत्न करतील



**मुंबई** : विधानसभा निवडणुकीनंतर शरद पवार हे मराठा समाजाला ओबीसी मधून आरक्षण देण्यासाठी संपूर्णपणे प्रयत्न करतील, असा गंभीर आरोप वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे. शरद पवार हे मनोज जरांगे पाटील यांच्यासोबतच आहेत, हे आता स्पष्ट झाले असल्याचे देखील त्यांनी म्हटले आहे. यासंदर्भात विधानसभा निवडणुकीनंतर शरद पवार प्रयत्न करणार असल्याचा दावा देखील प्रकाश आंबेडकर यांनी केला आहे.

मराठा समाजाच्या आरक्षणासाठी मनोज जरांगे पाटील हे पुन्हा एकदा उपोषणाला बसले आहेत. त्यांच्या या उपोषणामुळे आता पुन्हा एकदा मराठा विरुद्ध ओबीसी वाद राज्यभरात चर्चेचा विषय ठरत आहे. त्यातच वंचित बहुजन आघाडीचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी शरद पवार यांच्यावर हा आरोप केला आहे. शरद पवार हे जरांगे पाटील यांच्याबरोबर आहेत, हे आता स्पष्ट झाले आहे. मराठा समाजाला ओबीसीतूनच आरक्षण मिळाले पाहिजे, या मागणीला शरद पवार यांचा पूर्णपणे पाठिंबा आहे. त्यासाठी ते प्रयत्न करतील, असे देखील स्पष्ट झाले आहे. मात्र शरद पवार यांचा हा प्रयत्न विधानसभेच्या निवडणुकीनंतर होईल, असे देखील प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे.

ओबीसी आणि मराठा यांच्या आरक्षणाचे ताट वेगळे असावे, अशी स्पष्ट भूमिका प्रकाश आंबेडकर यांनी मांडली होती. मनोज जरांगे पाटील यांनी ओबीसी मधून मराठा समाजाला आरक्षण मागितले आहे. आणि त्याला आमचा पूर्ण विरोध असल्याचे प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले होते. राज्यामध्ये 55 लाख मराठ्यांना ओबीसीचे प्रमाणपत्र इश्यू केले आहेत, ते देखील रद्द करण्यात यावे, अशी आमची मागणी असल्याचे प्रकाश आंबेडकर यांनी म्हटले आहे. जो कोणी ओबीसी आहे, त्यांनी कागदपत्र दाखल केली, त्यांनी रितसर अर्ज दाखल केला तर त्याला ओबीसी प्रमाणपत्र मिळू शकते, असे देखील आंबेडकर यांनी म्हटले आहे.


प्रवेश सुरू ! प्रवेश सुरू !! प्रवेश सुरू !!!

बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर

Sanitary Health Inspector

या कोर्ससाठी प्रवेश चालू आहेत

संपर्क : 9405109103, 8830838903


# घटस्फोटाच्या बातम्यांवर नेहा कक्कर चा नवरा म्हणाला.....

**मुंबई** : प्रसिद्ध गायिका नेहा कक्कर तिच्या खासगी आयुष्यामुळे चर्चेत आली आहे. गेल्या काही दिवसांपासून नेहा कक्कर आणि रोहनप्रीत सिंह यांच्या घटस्फोटाच्या बातम्या समोर येत आहे. दोघंही घटस्फोट घेणार असल्याचे बोलले जाते आहे. अशातच नेहाच्या नवऱ्याची म्हणजेच रोहनप्रीत सिंह यांने प्रतिक्रिया दिली असून त्याने घटस्फोटाच्या बातम्यांवर मौन सोडले आहे.रोहनप्रीत सिंह याने इन्स्टंट बॉलीवूडला दिलेल्या मुलाखतीत म्हंटले की, नेहा आणि माझ्या घटस्फोटाच्या बातम्या म्हणजे निव्वळ अफवा आहेत, त्यात काही तथ्य नाही. या फक्त घडवलेल्या गोष्टी आहेत. उद्या कोणी उठेल आणि काही बोलेल त्याचा वैयक्तिक नातेसंबंधावर परिणाम होऊ देणार नाही.रोहनप्रीत पुढे म्हणाला की, अशाप्रकारच्या गोष्टी एका कानाने ऐकून दुसऱ्या कानाने सोडून द्यायच्या. हे लोकांचे कामच आहे त्यांना असे करण्यात मजा येते अशी प्रतिक्रिया दिली आहे. त्यामुळे नेहा कक्कर आणि रोहनप्रीत सिंह यांचे वैवाहिक आयुष्य सुखात सुरु असून घटस्फोट घेणार असल्याच्या बातम्या अफवा आहेत.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002